महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :डीआरए-०५२२/प्र.क्र.०६/२०२२/२१ दिनांक :- १९ जानेवारी,२०२३

**-: प्रसिध्दीपत्रक:-**

विषय:- सहायक नगररचनाकार, महाराष्ट्र शहर नियोजन आणि मुल्यनिर्धारण सेवा श्रेणी-१, गट-ब, चाळणी परीक्षा -२०२२

संदर्भ:- जाहिरात क्र.००५/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या सहायक नगररचनाकार, महाराष्ट्र शहर नियोजन आणि मुल्यनिर्धारण सेवा श्रेणी-१, गट-ब (जा.क्र.००५/२०२२) चाळणी परीक्षा -२०२२ या परीक्षेचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार मुलाखतीसाठी प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्याच्या पृष्ठयर्थ मुलाखतीच्या वेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुलाखतीस बोलविण्यात येईल. उमेदवारांनी आवेदन पत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चूकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक मुळ प्रमाणपत्रांची पूर्तता मुलाखतीचे वेळी न केल्यास, तसेच अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासताना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२. सदर निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या वेबसाईटवर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल. याची कृपया संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उपसचिव (राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण- मुंबई

Digitally Signed By
Sunil Harishchandra Awatade
19 JAN 2023 07:44:25 PM +0530